KP-22-1 9

कामांच्या ब-१ करारनाम्यात पोस्ट क्वालिफकेशन
क्रायटेरियाची तरतूद करणेबाबत

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
परिपत्रक क्रमांक :- निविदा १०/२०००/प्र.क्र.५०२/इमारती-२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २५ ऑक्टोबर, २०००

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत रस्ते, पूल व इमारतींची मोठमोठी बांधकामे हाती घेण्यात येत असल्यामुळे कामासाठी स्पर्धा होऊन कामे विहित कालमर्यादेत आणि उत्तम गुणवत्तेची होण्यासाठी कामांच्या करारनाम्यात पोस्ट क्वालिफिकेशन क्रायटेरियाबाबतची तरतूद समाविष्ट करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. आता यासंदर्भात खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

१) कामाच्या ब-१ करारनाम्यात खालीलप्रमाणे पोस्ट क्वालिफिकेशनची तरतूद समाविष्ट करण्यात यावी.

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | मागील तीन वर्षातील कंत्राटदारांची सरासरी वार्षिक उलाढाल | : | देय असलेल्या कामाच्या किंमतीच्या कमीत कमी ७५ % (चालू दराने) |
| ब) | कंत्राटदारांनी तुल्यबळ किंमतीचे किमान एक त्या सदृष काम पूर्ण केलेले असले पाहिजे त्याची कमीत कमी किंमत | : | देय कामांच्या किंमतीनुसार (चालू दराने)<br>१)रु.३ कोटी ते रु.१० कोटी : ३०%<br>२)रु.१० कोटीपेक्षाजास्त : ३०% किंवा रु.५ कोटी यापैकी जास्त असणारी किंमत |
| क) | देय कामासाठी कोणत्याही एका वर्षात ज्या महत्वाच्या परिमाणाच्या बाबी करावयाच्या आहेत त्याचे कमीत कमी परिमाण | : | देय कामांतील महत्वाच्या बाबींच्या परिमाणाच्या ३०% |
| ड) | कंत्राटदारांची निविदा भरण्याची सक्षमता (बिड कपॅसिटी) | : | (अे × एन × २) - बी<br>जेथे अे - गेल्या तीन वर्षातील कमीत कमी वार्षिक उलाढाल (चालू दराने)<br>एन - देय कामांचा कालावधी<br>बी - हातातील कामांची किंमत (देय कामांच्या कालावधीतील) |

इ) देय कामांच्या विशिष्ट स्वरुपानुसार समकक्ष काम कंत्राटदारांनी प्रत्यक्ष केलेले असणे अनिवार्य करण्यात यावे.

उदा. १) बहुमजली इमारतींच्या बांधकामात विशिष्ट व वेगळया तंत्रज्ञानाचा वापर करणे अपेक्षित असल्याने किमान तळमजला अधिक वरील काही मजले अशा स्वरुपाच्या इमारतीचे बांधकाम.(वरील मजल्यांची संख्या क्षेत्रीय स्तरावर विहित करण्यात यावी.)

२) ग्पइल फाऊंडेशनचे काम

३) पुलाच्या बांधकामाच्या नियोजित स्वरुपानुसार तशा पुलांचे बांधकाम, वगैरे.

फ) देय कामासाठी कंत्राटदाराकडे उपलब्ध असावयाची स्वतःच्या मालकीची यंत्रसामुग्री व प्रकल्प व्यवस्थापनाबाबतची व्यवस्था याचे निकष मुख्य अभियंता यांनी प्रत्येक प्रकरणी तपासणी करुन निश्चित करावेत.

२. उलाढाल, कामाची किंमत इत्यादींची परिगणना चालू दराने करताना प्रतिवर्षी १० टक्के वाढ विचारात घेण्यात यावी.

३. उपरोक्त (क) नुसार बाबींची निवड करताना देय कामामधील महत्वाच्या व ठळक बाबी विचारात घ्याव्यात.

४. हातातील कामांची उर्वरित किंमत बिनचूक व परिपूर्णरीत्या सादर करणे कंत्राटदारांवर बंधनकारक राहील. तसेच देय कामासाठी निविदा सादर केल्यानंतर पण त्यासंबंधी अंतिम निर्णय होण्यापूर्वी एखादे नवीन काम मिळाल्यास त्यासंबंधीची माहिती त्वरित सादर करणे देखील कंत्राटदारांवर बंधनकारक राहील. अन्यथा नियमानुसार ते यथोचित कारवाईस पात्र राहतील.

५. उपरोक्त (ड) नुसार निकष निश्चित करताना समकक्ष कामाची व्याख्या नि:संदिग्ध असण्याबाबत दक्षता घ्यावी.

६. कामाच्या करारनाम्यात पोस्ट क्वालिफिकेशन क्रायटेरिया समाविष्ट केलेला आहे, ही बाब निविदा सूचनमध्ये समाविष्ट करावी.

७. रु.३ कोटी आणि त्यावरील अंदाजित किंमतीच्या कामांसाठी पोस्ट क्वालिफिकेशनची पध्दत लागू राहील.वरील पध्दत सार्वजनिक बांधकाम विभागातील कामांसाठी लागू राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( शि. वि. तामखडे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

मा. मुख्यमंत्री ह्यांचे प्रधान सचिव,
मा.मंत्री (सा.बां.)/पाटबंधारे ह्यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (सा.बां.)/पाटबंधारे ह्यांचे खाजगी सचिव,
वित्त विभाग/सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,
महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र राज्य मुंबई/नागपूर,
महालेखापाल, लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य मुंबई/नागपूर,
सचिव (रस्ते)/सचिव (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग, ह्यांचे स्वीय सहाय्यक,
पाटबंधारे विभाग, मंत्रालय,
सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय

प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी.

सर्व मुख्य अभियंते, सा.बां.विभाग/पाटबंधारे विभाग,
मुख्य अभियंता, बृहन्मुंबई क्षेत्र विकास प्राधिकरण, मुंबई महाराष्ट्र,
गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा), मुंबई, महाराष्ट्र,
औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई,
व्यवस्थापकीय संचालक, शहर व औद्योगिक विकास महामंडळ, (सिडको), निर्मल बिल्डींग, नरीमन पॉइंट, मुंबई/महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई,
पाटबंधारे विकास महामंडळ, कृष्णा/तापी/गोदावरी/विदर्भ,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई,
आयुक्त, सर्व महानगरपालिका (२ प्रतींसह),
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा,
अधीक्षक अभियंता व प्रादेशिक अधिकारी,भूपृष्ठ वाहतूक मंत्रालय (MOST), चेंबूर, मुंबई,
सर्व अधीक्षक अभियंते, सा.बां.विभाग/पाटबंधारे विभाग,
अधीक्षक अभियंता, पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, वरळी, मुंबई/महानगरपालिका,ठाणे/पुणे/कल्याण
संचालक, उपवने आणि उद्याने, मुंबई,
प्रतिनियुक्तीवरील सर्व अधिकारी,
सर्व कार्यकारी अभियंते, सा.बां.विभाग/पाटबंधारे विभाग/जिल्हापरिषद,
सर्व अधिकारी/कार्यासन अधिकारी, सा.बां.विभाग/पाटबंधारे विभाग, मंत्रालय,
कार्यासन इमारती-२ (निवड नस्ती)